# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक:17.01.2026 वार:शनिवार

1. राज्यातल्या 29 महानगरपालिकांपैकी 20 पेक्षा जास्त महापालिकांमध्ये भाजपाला घवघवीत यश
2. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसला; तर मुंबईत ठाकरे बंधूंना अपेक्षित यश नाही
3. भाजपाला विजयी करून जनतेनं विकासाच्या बाजूने कौल दिल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन; कार्यकर्ते आणि मतदारांचे मानले आभार
4. महापालिका निवडणुकीत काँग्रेसला अपेक्षित यश नसलं, तरी वैचारिक लढा सुरुच राहणार-हर्षवर्धन सपकाळ आणि
5. स्टार्ट अप्सनं देशात 10 वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

**निकाल**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीत 20 पेक्षा जास्त महापालिकांवर भारतीय जनता पार्टी आणि महायुतीला घवघवीत यश मिळालं आहे. ठाण्याचा गड राखण्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला यश आलं आहे, तर भिवंडी निजामपूर, लातूर आणि चंद्रपूरमध्ये कॉंग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. परभणीमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला यश मिळालं आहे. कोल्हापूरमध्ये महायुतीचा विजय झाला असला तरी तिथे कॉंग्रेसनं युतीला जोरदार टक्कर दिली.

**मुंबई ठाणे परिसर**

**बृहन्मुंबई** महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना महायुतीला निर्णायक आघाडी मिळाली आहे. या ठिकाणी भाजपा 89 जागांवर तर शिवसेना 29 जागांवर विजयी झाली आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला 65 जागांवर तर राज ठाकरे यांच्या पक्षाला केवळ 6 जागांवर यश मिळालं आहे. काँग्रेसने 24 जागा जिंकल्या.

**ठाणे** महानगरपालिकेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला 75, भाजपा 28, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला 12 तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला 9 ठिकाणी विजय मिळाला आहे. इथे शिवसेना ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला 1 आणि मनसेला एकही जागा मिळाली नाही.

**कल्याण डोंबिवलीत** भाजपाने 50 तर शिवसेनेने 53 ठिकाणी विजय मिळवला आहे. **नवी मुंबईमधे** भाजपा 65 जागा जिंकत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.

**भिवंडी निजामपूरमधे** काँग्रेसने 30 जागा जिंकल्या आहेत. भाजपाने 22 तर शिवसेनेने 12 ठिकाणी विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षालाही बारा ठिकाणी यश मिळालं आहे.

**वसई विरारमधे** बहुजन विकास आघाडीने महानगरपालिकेची सत्ता कायम राखली आहे. इथं भाजपाला 43 जागा जिंकण्यात यश मिळालं आहे. **पनवेलमधे** 55 जागा तर मीरा भाईंदरमधे 78 जागा जिंकत भाजपाने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं आहे.

**उल्हासनगरमधे** स्वबळावर लढलेल्या शिवसेनाला 34 जागांवर विजय मिळाला आहे. तर पप्पु कलानी यांच्यासोबत आघाडीत असलेल्या भाजपाने 22 जागा जिंकल्या आहेत.

**पश्चिम महाराष्ट्र**

**पुणे आणि पिंपरी चिंवडसह** पश्चिम महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच महापालिकांमध्ये भाजपा महायुतीला दणदणीत विजय मिळाल्याचं चित्र आहे. पुणे महापालिकेच्या 165 जागांपैकी 119 जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एकत्र येऊनही त्यांना फार मोठं यश मिळवता आलं नाही. दोन्ही पक्षांना मिळून 30 जागा मिळाल्या आहेत.

**पिंपरी चिंचवड** महापालिकेची निवडणूकही जवळपास एकतर्फी झाल्याचं चित्र आहे. इथेही भाजपालाच आघाडी मिळाली असून 128 जागांपैकी 85 जागांवर भाजपाला यश मिळालं आहे.

**कोल्हापूर** महानगरपालिकेत भाजपा, एकनाथ शिंदे यांचा शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या महायुतीने सत्ता काबीज केली आहे. कोल्हापूरच्या 81 जागांपैकी 44 जागांवर महायुतीला विजय मिळाला आहे. मात्र या ठिकाणी महाविकास आघाडी आणि त्यातही कॉंग्रेसनं युतीला जोरदार लढत दिली. एकट्या कॉंग्रेसने 35 जागांवर विजय मिळविला. **इचलकरंजीमध्ये** स्वतंत्र महानगरपालिका झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक होती; इथेही भाजपानेच एकहाती सत्ता मिळवली आहे.

**सांगली, मिरज आणि कुपवाड** शहर महानगरपालिकेच्या 78 जागांपैकी भाजपाला 39; शिवसेनेला 2, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 16, तर काँग्रेसला 18 जागा मिळाल्या. सोलापूर महापालिकेमध्येही 102 जागांपैकी 87 जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी झाले आहेत.

**अहिल्यानगर** महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी यांनी बाजी मारली आहे. एकंदर 68 जागांपैकी 52 जागा मिळवत भाजप आणि राष्ट्रवादीने एकहाती सत्ता मिळवली आहे.

<u>मराठवाडा</u>

मराठवाड्यातल्या पाच महापालिकांमध्ये भाजपाला तीन तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला प्रत्येकी एका महापालिकेवर सत्ता स्थापन करता येणार आहे.

**छत्रपती संभाजीनगर** इथं सर्वच पक्षांनी निवडणूक स्वबळावर लढवली. इथल्या 115 जागांपैकी भाजपला 56; तर शिवसेनेला 14 आणि एमआयएम पक्षाला 33 जागा मिळाल्या आहेत.

पहिल्यांदाच निवडणूक झालेल्या **जालना** महापालिकेची सत्ता भारतीय जनता पक्षाने मिळवली आहे. 65 सदस्य संख्या असलेल्या या महापालिकेत भाजपने 41 तर शिवसेनेने 12 जागा जिंकल्या.

**परभणी** महापालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सत्ता स्थापनेकडे वाटचाल होत असल्याचे संकेत आहेत.

**लातूर** महापालिकेत काँग्रेस पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवलं. 70 सदस्य संख्या असलेल्या लातूर मनपात काँग्रेसनं 43 जागा जिंकल्या, तर वंचित बहुजन आघाडीला 4 जागांवर विजय मिळाला.

**नांदेड** महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. महापालिकेच्या 81 जागांपैकी भाजपला सर्वाधिक 45 जागांवर विजय मिळाला आहे.

<u>उत्तर महाराष्ट्र</u>

**नाशिक** महापालिकेत भाजपाला एकहाती सत्ता मिळाली आहे. 122 जागांपैकी 72 जागांवर भाजपाचे उमेदवार निवडणून आले आहेत. **मालेगावमध्ये** इस्लाम पक्षाला 35, एम आय एमला 21, शिवसेनेला 18, कॉंग्रेसला 3 आणि समाजवादी पार्टीला 5 जागा मिळाल्या.

**धुळे** महापालिकेत 74 जागांपैकी भाजपने 50 जागांवर विजय आहे. तर एमआयएम 10 जागांवर यश मिळालं आहे. **जळगाव** महापालिकेत 75 जागांपैकी 50 जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. शिवसेनेला 16 जागांवर विजय मिळाला असून राष्ट्रवादीला एका जागेवर विजय मिळाला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 5 जागांवर विजय मिळाला.

<u>विदर्भ</u>

विदर्भात भाजपाला मिश्र यश मिळालं असलं तरी **नागपूरमध्ये** मात्र भाजपाला निर्विवाद यश मिळालं आहे. नागपूर महानगरपालिकेत 151 जागांपैकी एकंदर 102 जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत. नागपुरात 34 जागांवर काँग्रेसनं यश मिळवलं आहे.

**चंद्रपूर** महानगरपालिकेत कॉंग्रेसनं बाजी मारली असून त्यांनी 66 जागांपैकी 30 जागांवर विजय मिळवला आहे. भाजपानं 23 जागा जिंकल्या आहेत. तिसऱ्या क्रमांकावर शिवसेना उबाठा गट असून त्यांना 6 जागा मिळाल्या आहेत.

**अमरावती** महानगरपालिकेच्या 22 प्रभागांतील 87 जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाला 25 तर काँग्रेसला 15 जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानं 11 जागांवर विजय मिळवला आहे. तर युवा स्वाभिमान पक्षाने 16 जागांवर विजय प्राप्त केला आहे.

**अकोला** महानगरपालिका निवडणुकीत 80 जागांपैकी भाजपने 38 जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. काँग्रेसनं 21 जागांवर विजय मिळवत दुसरा क्रमांक मिळवला आहे.

**प्रतिक्रिया**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. महायुती सरकारच्या लोकाभिमुख विकासावरच लोकांचा विश्वास आहे, हे यातून सिद्ध झाल्याचं मोदी यांनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि नितीन गडकरी यांनी यांनीही समाजमाध्यमावरून पक्षनेतृत्व आणि कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आहे.

भाजपाच्या या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेचे आभार मानले आहेत, याबाबत काल माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले....

**आणि ज्याप्रकारे वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये रेकॉर्ड ब्रेक अशा पद्धतीचं मँडेट आहे. या मँडेट ने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की लोकांना विकास हवा आहे. लोकांना प्रामाणिकता हवी आहे आणि म्हणून लोकांनी आपल्याला या ठिकाणी निवडून दिलेलं आहे. आणि आज एक गोष्ट अजून या निकालाने स्पष्ट केलेली आहे. महाराष्ट्राचा विश्वास हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींवरच आहे हे देखील या निकालाने स्पष्ट केलेलं आहे. आणि म्हणून आज खऱ्या अर्थानं या निकालाच्या निमित्ताने हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचंही मी स्मरण करतो कारण त्यांचाही आशीर्वाद हा आपल्या महायुतीच्याच पाठीशी होता आणि म्हणून हा विजय आपल्याला या ठिकाणी मिळालेला आहे. आणि पुढेही आमचा एजेंडा हा विकासच असणार आहे.**

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेलं यश समाधानकारक नसलं तरी यश अपयशाची पर्वा न करता, आम्ही वैचारिक लढाई लढलो, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं आहे......

**काँग्रेसने याही निवडणुकीत सर्वात जबाबदार विरोधी पक्ष ही भूमिका आणि सर्वात मोठा विरोधी पक्ष ही भूमिका पार पाडलेली आहे साडेतीनशे नगरसेवक एकूण आमचे महानगरपालिकेमध्ये निवडून येतील पाच ठिकाणी आम्ही सत्तेत बसू तर दहा ठिकाणी आमची सत्तेत भागीदारी ही राहील आमच्याशिवाय सरकार होऊ शकणार नाही अशी एकंदर महाराष्ट्रातली परिस्थिती आहे. आणि पॅन महाराष्ट्रात क्रमांक दोनचा पक्ष किंवा क्रमांक तीनचा पक्ष म्हणून काँग्रेस हा पॅन महाराष्ट्रात राहील आणि या अनुषंगानं आगामी काळात आम्ही आमची वैचारिक भूमिका आणि राजकीय जी लढाई आहे ती लढत ही सत्तेच राजकारण नाही तर विचारांचं राजकारण आहे या भूमिकेतून आम्ही पुढे जात आहोत.**

जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. शिवसेनेचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या महायुतीच्या विजयाबद्दल जनतेचे आभार मानले आहेत.

**जिप निवडणूक**

राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरायला कालपासून सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी 21 जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील. 22 जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि 27 जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**स्टार्टअप**

भारत स्टार्टअप अभियान ही केवळ अभियान नसून विविध क्षेत्रातल्या नवनव्या संधींचं ते एक इंद्रधनुष्य आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत भारत मंडपम इथं केलं. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. युवकांच्या स्वप्नांचा प्रवास या स्टार्ट अप्समधून दिसून येत असून त्यांनी 10 वर्षांमध्ये देशात क्रांती घडवून आणली असल्याचं मोदी म्हणाले. हे अभियान सुरू झालं तेव्हा जेमतेम 500 स्टार्टअप्स होते, ती संख्या 2 लाखांवर गेली आहे आणि त्यामध्ये सुमारे 45 टक्के स्टार्टअप्स ही महिलांनी सुरू केली आहेत, हे अतिशय उल्लेखनीय आहे. या स्टार्टअप्स मधून सुमारे साडे 17 लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारताचं नाव जगातल्या तिसऱ्या क्रमांकाच्या स्टार्टअप परिसंस्थेच्या रुपानं प्रसिद्ध झाल्याचा अभिमान वाटत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. मोदी यांनी इथं आयोजित प्रदर्शनालाही भेट दिली.

राष्ट्रीय स्टार्टअप दिनाचं औचित्य साधून उत्कृष्ट राज्य स्टार्टअप परिसंस्था म्हणून महाराष्ट्राला नेतृत्व श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्टार्टअप धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसमावेशक सहभाग यासाठी देशातील स्टार्टअप परिसंस्थेतील सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राला गौरवण्यात आले.

**एनसीईआरटी**

शुरांच्या प्रेरक जीवनकथा विद्यार्थांमध्ये रुजवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये नागरी सजगतेची भावना निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या राष्ट्रीय वीरगाथा स्पर्धेत राज्यातल्या 19 विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, तसंच संरक्षण आणि शिक्षण मंत्रालय यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं होतं. राज्यपातळीवरच्या 402 प्रवेशिकांपैकी 19 विद्यार्थ्यांची निवड राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्तम 100 विद्यार्थ्यांमध्ये झाली आहे. या विद्यार्थ्यांना 26 जानेवारीच्या संचलनात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहता येणार असून प्रत्येकी 10 हजार रुपयांचं पारितोषिक, प्रमाणपत्र आणि पदक प्रदान केलं जाणार आहे. या सर्व विजेत्यांचं शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागानं अभिनंदन केलं आहे.

**पुणे ग्रँड टूर**

पुणे ग्रँड चॅलेंज टूर ही सायकलिंग स्पर्धा 19 ते 24 जानेवारी दरम्यान होणार आहे. पुण्यातून ही स्पर्धा 19 जानेवारी रोजी जाणार असून स्पर्धेच्या मार्गावरील रस्ते रात्री 12 ते संध्याकाळी 7 या वेळेत अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्वांसाठी टप्प्याटप्प्याने बंद राहणार आहेत. या मध्ये फर्ग्युसन कॉलेज रस्ता, सिमला ऑफिस चौक, जंगली महाराज रस्ता याचा समावेश आहे. तर स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात 21 जानेवारी रोजी सकाळी 8 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. सासवड, राजगड, वेल्हे आणि हवेली भागात जिथे पर्यायी मार्ग उपलब्ध आहे, तिथे पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात येणार असून काही ठिकाणी ती पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनी प्रवासाआधी या बदलांची माहिती करून घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. सिंहगड किल्ल्यावर जाणारी पर्यटकांची वाहतूक 21 जानेवारी रोजी स्पर्धा संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे, असंही या आदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**मेनोपॉज क्लिनिक**

महिलांसाठी 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं असल्याचं, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात आलं आहे. प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, हाच यामागचा उद्देश असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

**प्रजासत्ताक दिन-महासंवाद**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित होणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'ॲट होम' या स्वागत समारंभासाठी राज्यातल्या चार मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. रायगड सगुणा बागचे चंद्रशेखर भडसावळे, नांदेडचे सर्पदंश तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे, जळगावचे अरविंद चौधरी आणि मुंबईचे स्टार्टअप उद्योजक आकाश शहा यांना राष्ट्रपतींकडून विशेष निमंत्रण पाठविण्यात आले आहे.

**हवामान**

राज्यात आज हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.